आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयाच्या अधिपत्याखालील सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, वर्धा कार्यालयातील गट-ड मधील मृत घोषित केलेले ०१ शिपाई पद अनुकंपा नियुक्तीसाठी नियमित पद म्हणून पुनर्जिवित करण्यास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक:-मत्स्यआ २०२६/प्र.क्र.१२० /पदुम-१२
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- २७ जुलै, २०२६

पहा :-

१) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र.मत्स्यआ २०२१/प्र.क्र.१४८/पदुम-१२, दिनांक १७/१२/२०२५.
२) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पदनि २०२२/प्र.क्र.१५/आ.पु.क., दिनांक ०८/०८/२०२४
३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.अकंपा-१२२५/प्र.क्र.१२१/म.लो.आ., दिनांक १७/०७/२०२५
४) आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.मत्स्य/प्रशा/१५१५०७/३७/ २०२४, दिनांक १०/०६/२०२६.

प्रस्तावना :-

कृषि व पदुम विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील व आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखालील सुधारित आकृतीबंध संदर्भाधीन दिनांक १७/१२/२००२६ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आला असून यामध्ये शिपाई-१७० पदे मृत संवर्ग घोषित करण्यात आली आहेत.

२. वित्त विभागाच्या दिनांक ०८/०८/२०२४ च्या शासन निर्णयानुसार अनुकंपा नियुक्त्यांसाठी गट-ड मधील मृत घोषित केलेल्या संवर्गातील आवश्यक तितकी नियमित पदे राखून ठेवण्याचे अधिकार तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १७/०७/२०२५ च्या शासन निर्णयानुसार गट-ड मधील जेवढी पदसंख्या मृत घोषित केली आहे त्या पदसंख्येच्या मर्यादेत अनुकंपा नियुक्तीसाठी आवश्यक पदे नियमित पदे म्हणून पुनर्जिवित करण्याचे अधिकार प्रशासकीय विभागांना देण्यात आले आहेत.

३. त्यानुषंगाने आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयाने संदर्भ क्र.४ च्या पत्रान्वये केलेल्या विनंतीनुसार सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, वर्धा कार्यालयातील गट-ड मधील मृत घोषित केलेले ०१ शिपाई पद दिवंगत श्री.सु.बा.परटक्के यांचा मुलगा श्री.कौशिक सु. परटक्के यांना अनुकंपा तत्वावर तत्वावर शिपाई पदी नियुक्ती देण्यासाठी पुनर्जिवित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, वर्धा कार्यालयातील गट-ड मधील मृत घोषित केलेले ०१ शिपाई पद अनुकंपा नियुक्तीसाठी नियमित पद म्हणून पुनर्जिवित करण्यास याव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर पदावर अनुकंपा तत्वावर नियुक्तीच्या अनुषंगाने, नियुक्ती प्राधिकारी यांनी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि.१७.०७.२०२५ नुसार कार्यवाही करावी.

३. उपरोक्त प्रमाणे पुनर्जिवित केलेल्या शिपाई, गट-ड या पदावर अनुकंपा तत्वावर नियुक्ती केलेल्या कर्मचाऱ्याच्या पदोन्नती, सेवानिवृत्तीने अथवा इतर कारणामुळे सदर पद रिक्त झाल्यावर ते नियमित आपोआप पद व्यपगत होईल.

४. याप्रित्यर्थ होणारा खर्च मागणी क्र. डी-०६, २४०५ मत्स्यव्यवसाय, ००१ संचालन व प्रशासन, (००)(०२) जिल्हा कार्यालये, २४०५ ००३९ (अनिवार्य) या लेखाशिर्षाखाली ०१-वेतन या लेखाशिर्षाखाली विहित पद्धतीने निधी अर्थसंकल्पित करुन, संबंधित वित्तीय वर्षात मंजुर होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या संदर्भाधीन शासन निर्णय, दिनांक ०८/०८/२०२४ अन्वये तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन शासन निर्णय, दिनांक १७/०७/२०२५ अन्वये प्रशासनिक विभागांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०७२७१६२०३४६६४५ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

JAKHATE KISHOR MAHADEO

Digitally signed by JAKHATE KISHOR MAHADEO
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Fisheries Department,
2.5.4.20=83112E1445917D0A21FBAB36D7C0FF41E09863C93A2E62EA1B0C01DA16B7A161, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=032A6ACBFD529D66DD76E26EAB14B28C6DD07D2F776E529B44BA2CB45324C503, cn=JAKHATE KISHOR MAHADEO
Date: 2026.07.27 16:21:30 +05'30'

(कि. म. जकाते)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव
२) मा.उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा. मंत्री (मत्स्यव्यवसाय) यांचे खाजगी सचिव
४) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
५) सचिव (पदुम), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
६) आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७) महालेखापाल, लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ /२, मुंबई/नागपूर
८) सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, वर्धा
९) वित्त विभाग, आपुक/व्यय-१०/अर्थसंकल्प-११, मंत्रालय, मुंबई
१०) निवडनस्ती, पदुम-१२.